## वादीतर्फे साक्षीदार क्र. १ रोशन बापू पवार यांचा ज्यादाचा सरतपास वादीचे विधिज्ञ श्री. एन.के.आहेर यांच्यातर्फे शपथेवर सुरु

१. मी जे पुराव्याचे शपथपत्र दाखल केलेले आहे त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यासोबत मी वादमिळकत गट नं. १७० च्या ७/१२ उताऱ्याची प्रमाणित प्रत दाखल केलेली आहे. त्यावर तलाठीची सही व शिक्का आहे. त्याला **निशाणी २५** देण्यात येते. तसेच मी प्रस्तुतकामी गट नं. ३५४ च्या ७/१२ उताऱ्याची प्रमाणित प्रत दाखल केलेली आहे. त्यावर तलाठीची सही व शिक्का आहे. त्याला **निशाणी २६** देण्यात येते. तसेच मी प्रस्तुतकामी फेरफार क्र. १२६१ ची प्रमाणित प्रत जोडलेली आहे. त्यावर तलाठीची सही व शिक्का आहे. त्याला **निशाणी २७** देण्यात येते. तसेच फेरफार क्र. १५३२ ची प्रमाणित प्रत जोडलेली आहे. त्यावर तलाठीची सही व शिक्का आहे. त्याला **निशाणी २८** देण्यात येते. तसेच फेरफार क्र. १६११ ची प्रमाणित प्रत जोडलेली आहे. त्यावर तलाठीची सही व शिक्का आहे. त्याला **निशाणी २९** देण्यात येते.

**ज्यादाचा सरतपास पूर्ण**

**उलटतपास प्रतिवादीचे विधिज्ञ श्री. एस.एम.सोनवणे यांच्यातर्फे शपथेवर सुरु**

२. मी सध्या वडाळीभोई येथे राहण्यास आहे. मी वडाळी भोई येथे पाच वर्षांपासून राहत आहे. पाच वर्षांपूर्वी मी नाशिकला राहायला होतो. मी नाशिकला दहा वर्षे राहिलो. नाशिकला राहण्यापूर्वी मी शिंदे ता. चांदवड येथे राहण्यास होतो. मी माझा जन्म झाल्यानंतर साधारणतः दीड वर्षाने शिंदे ता. चांदवड येथे राहण्यास होतो.

३. माझी जन्म तारीख २४.०४.१९९४ अशी आहे. माझी आई सन २००७ मध्ये मयत झाली व माझे वडील सन २००२ मध्ये मयत झाले. मला एक लहान बहिण आहे. ती व मी प्रतिवादी क्र. १ कडे राहायला होतो. हे म्हणणे खरे आहे की माझे व माझ्या बहिणीचे इयत्ता १० वी पर्यंतचे शिक्षण शिंदेला प्रतिवादी क्र. १

कडेच झाले. मला प्रतिवादी क्र. १ व भास्कर पंढरीनाथ शिंदे असे दोन मामा आहेत. त्यापैकी भास्कर हे मयत आहेत. हे म्हणणे खरे आहे की माझे ११ वी, १२ वी चे शिक्षण मयत भास्कर शिंदे यांच्याकडे झाले होते. हे म्हणणे खरे आहे की भास्कर हे कुटूंबाचे कर्ते होते व ते नाशिकलाच नोकरीला होते. हे म्हणणे खरे आहे की माझ्या बहिणीचे लग्न शिंदेला असतांना सन २०१२ मध्ये झाले. हे म्हणणे खरे नाही की माझ्या बहिणीचे लग्न प्रतिवादी क्र. १ व भास्करने करुन दिले.

४. गोपीनाथ काशिनाथ शिंदे, कचेश्वर सिद्धेश्वर शिंदे, रामदास सिद्धेश्वर शिंदे, हरीदास सिद्धेश्वर शिंदे, हे माझे चुलत मामा आहेत. हे म्हणणे खरे नाही की सन २०१२ मध्ये माझे सख्खे मामा व वर नमुद चुलत मामा एकत्र राहत होते. माझे सख्खे मामा व चुलत मामा केव्हा पासून विभक्त झाले हे मला सांगता येणार नाही.

५. माझी बहिण वैशाली हिला भुत्याने ता. चांदवड येथे दिले आहे. हे म्हणणे खरे आहे की माझे सख्खे मामा प्रतिवादी क्र. १ व मयत भास्कर हे सन १९८७ पासून वेगळे राहतात. हे म्हणणे खरे आहे की माझे मामा भास्कर यांचा नाशिकला स्वतःचा व्यवसाय होता. माझे आजोबा पंढरीनाथ सन २०१० मध्ये मयत झाले. माझे आजोबा पंढरीनाथ हे मयत होईपर्यंत शिंदे गावीच राहत होते. माझे आजोबा पंढरीनाथ यांना सुमन नावाची एक मुलगी होती. सुमन सन २००७ मध्ये मयत झाली. तिला एक मुलगा व एक मुलगी आहे.

६. मयत भास्कर शिंदे यांना सिमा नावाची एक मुलगी आहे व ती दिंडोरीला राहते. हे म्हणणे खरे आहे की सिमाला मी या दाव्यामध्ये पक्षकार केले नाही. हे म्हणणे खरे आहे की प्रस्तुतचा दावा दाखल करतांना माझे मयत मामा भास्कर यांना सिमा नावाची मुलगी आहे हे मला माहित होते. तिला या दाव्यात का सामिल केले नाही याचे कारण मला सांगता येणार नाही.

७. हे म्हणणे खरे नाही की माझी आई सुमन हयात असतांना तिने तिचे वडील हयात असतांनाच त्यांच्या मिळकतीतील तिचा हक्क माझे मामा प्रतिवादी क्र. १ व

मयत मामा भास्कर यांच्या पक्षात सोडून दिले होते. हे म्हणणे खरे आहे की माझी आई सुमन हयात असतांना तिने कधीही वादमिळकतीत तिचा हक्क मागितला नाही किंवा सांगितला देखील नाही. हे म्हणणे खरे नाही की माझे, माझ्या बहिणीचे शिक्षण व लग्नकार्य माझ्या मामांनीच करुन दिले. माझे लग्न सन २०२१ मध्ये झाले. त्यावेळी मी भुत्यानाला राहत होतो.

**प्रतिवादीच्या विधिज्ञांच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब**

श्रवणोत्तर स्विकृत,

SUNGARE VRUSHALI DINANATH
Digitally signed by SUNGARE VRUSHALI DINANATH
Date: 2025.07.01 17:37:01 +0530

दि. ०१.०७.२०२५.
चांदवड.

(वृषाली दी. सुंगारे)
सह दिवाणी न्यायाधीश
क.स्तर, चांदवड.